Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
17 Dec 2017
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

# है तय्यार हम...




**ऑटोमोटिव्ह ग्रुप :** (डावीकडून) तेजस काटे, अतुल कुलकर्णी, सुधीर पाटील, जितेंद्र वायकोस, राजुसिंग राठोड, विनय पंजीयार (ब्रँच मॅनेजर), भूषण अग्रवाल, चेतन राजपूत, प्रकाश राठोड, तुषार गव्हाळ, विनोद बोराडे, अजय देशपांडे.




**इनरव्हील क्लब ऑफ औरंगाबाद लोटस...** (डावीकडून) रेखा हिवरे, परलीन सिंग, निकिता अग्रवाल, वैशाली सदगुले, गुरलीन कोहली, मोनाली लकडे, स्वाती कासलीवाल, देवयानी रॉय, विभा विटेकर.

## ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०७००, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.


**स्पर्धा**
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

## सातवीत असताना अनिल यांनी केला होता पहिला चित्रपट!



अनिल कपूर हा बॉलिवूडमधील चॉकलेट हिरो मानला जातो. अनिलने वयाची साठी पार केली असली तरी तो आजही एखाद्या तरुण मुलासारखाच दिसतो. आजच्या तरुण अभिनेत्यांना लाजवेल अशी त्याच्यात एनर्जी आहे. त्यामुळे अनिल कपूरचे नेहमीच कौतुक केले जाते. अनिल कपूरने हमारे तुम्हारे या चित्रपटाद्वारे त्याच्या कारकिर्दीला सुरुवात केली. या चित्रपटात संजीवकुमार, राखी, अमजद खान यांच्यासोबत अनिल कपूरदेखील महत्त्वाच्या भूमिकेत होता. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगला गल्ला जमवला होता. या चित्रपटातील अनेक गाणी त्या काळात गाजली. या चित्रपटानंतर अनिल कपूरचा वो सात दिन हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस आला. या चित्रपटाने अनिलला खऱ्या अर्थाने सुपरस्टार बनवले. पण तुम्हाला माहीत आहे का, हमारे तुम्हारे हा अनिल कपूरचा पहिला चित्रपट नाहीये. त्याने याआधीदेखील एका चित्रपटात काम केले होते. अनिल कपूरने पहिल्या चित्रपटात काम केले त्या वेळी तो केवळ सातवीत होता. त्याच्या एका मित्राकडून त्याला एका चित्रपटातील छोट्याशा भूमिकेविषयी कळले होते. त्या चित्रपटाचे नाव 'तू पायल मैं गीत' असे होते.

## अक्षयच्या नव्या फ्लॅटची किंमत ४ कोटी रुपये?



बॉलिवूडचा खिलाडी अक्षयकुमार त्याच्या सुपरहिट चित्रपटांसाठी ओळखला जातो. गेल्या काही काळापासून अक्षयचा प्रत्येक चित्रपट बॉक्स ऑफिसवर धूम उडवून देत आहे. परंतु तुम्हाला माहिती आहे का, की अक्षयला प्रॉपर्टी खरेदी करण्यातही खूप रस आहे? होय, रिअल इस्टेट क्षेत्राकडे अक्षयचा कल कधीच लपून राहिला नाही. आता पुन्हा एकदा अक्षयकुमारने त्याच्या संपत्तीत वाढ करताना मुंबईतील अंधेरी परिसरात एका ३८ मजली पॉश बिल्डिंगमध्ये तब्बल चार फ्लॅट खरेदी केले. या प्रत्येक फ्लॅटची किंमत सुमारे ४.५ कोटी रुपये इतकी आहे. सध्या अक्षय पत्नी ट्विंकल, मुलगा आरव आणि मुलगी नितारासोबत जुहूमध्ये एका डुप्लेक्स अपार्टमेंटमध्ये राहतो. त्याच्या अपार्टमेंटमधून समुद्राचा किनारा दिसतो. याव्यतिरिक्त अक्षयचा लोखंडवाला येथे एक फ्लॅट आणि बांद्रा परिसरात डुप्लेक्स अपार्टमेंटमध्ये आहे. त्याचबरोबर गोव्यातील अंजुनामध्ये पोर्तुगाली शैलीचा एक व्हिला त्याने खरेदी केला आहे. आता त्याने चार फ्लॅट खरेदी केल्याने त्याच्या संपत्तीत वाढ झाली आहे. अक्षयची भारताबरोबरच विदेशात प्रचंड संपत्ती आहे. विदेशातील काही देशांमध्ये त्याचे आलिशान बंगले आहेत.

## चिन्मय-सुकन्या-भाग्यश्रीचा सेल्फी व्हायरल!

गेल्या बऱ्याच आठवड्यांपासून अक्षयची कियाराला शोधण्यासाठी सुरू असलेली धडपड आता संपली आहे. कियारा आणि अक्षयची भेट झाली असून अमृता आणि अक्षय कियाराबद्दलचे सत्य घाडगे परिवारापासून लपवत आहेत. अमृताला ही लपवाछपवी मनापासून पटत नसली तरी देखील ती अक्षय आणि कियाराच्या प्रेमासाठी तसेच अक्षयसोबत सुरू झालेल्या नव्या मैत्रीच्या नात्यासाठी हे सगळे करण्यासाठी तयार झाली आहे.

या मैत्रीच्या नात्यामध्ये नकळत एक गंमतीदार गोष्ट घडते. अक्षयच्या रूममध्ये कियारा असताना अचानक माई रूममध्ये येतात, या दरम्यान कियाराला लपविण्यासाठी अमृता आजारी असल्याचे नाटक करते. अमृताला होत असलेल्या कोरड्या उलट्यांमुळे माईंना ती गरोदर असल्याचा संशय येतो. आता या संशयामधून कसे अमृता आणि अक्षय बाहेर पडणार? कियाराला ते कसे लपविणार? हे पुढील भागात प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

सध्या मालिकेमध्ये सुरू असलेली अमृता, अक्षय आणि कियाराची लपवाछपवी अजून किती दिवस घाडगे परिवारापासून लपून राहील हे बघणे गंमतीदार असणार आहे. मालिकेमधील अमृता घाडगे म्हणजेच भाग्यश्री लिमये हिने मालिकेला तीन महिने पूर्ण झाल्याच्या आनंदात तिचा माई आणि अक्षय सोबतचा फोटो तिच्या फेसबुक अकाउंटवर पोस्ट केला होता. या फोटोला अनेक लाईक्स मिळाले आहेत. हा सेल्फी सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.





परीक्षक गीता कपूरने दीपिकाच्या एका नृत्याची नुकतीच कोरिओग्राफी केली होती. त्यामुळे गीता आणि दीपिका यांच्यात खूप चांगले ट्युनिंग जमले आहे. शिल्पासोबत दीपिकाने एक मजेदार सेल्फी काढला. या कार्यक्रमात सहभागी होण्याचा दीपिकाचा खूपच चांगला अनुभव होता. या कार्यक्रमातील सगळ्यांच स्पर्धकांचे नृत्य दीपिकाला आवडले.



### Glam Window



## प्रियंकाचा देसी अंदाज

अमेरिकेत तसेच अनेक देशांत थँक्स गिव्हिंग डे साजरा करण्यात येतो. आभारप्रदर्शनाचा, कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असतो. बॉलिवूडची अभिनेत्री प्रियंका चोप्रानेही तिच्या व्यग्र वेळापत्रकातून वेळ काढून हा दिवस साजरा केला आहे. या सेलिब्रेशनचे काही फोटो आणि व्हिडिओ तिने इन्स्टाग्रामवर पोस्ट केले.



## अनुष्का-साक्षी जुन्या मैत्रिणी!

बॉलिवूड अभिनेत्री अनुष्का शर्मा क्रिकेटपटू विराट कोहलीसोबत असलेल्या प्रेमसंबंधांमुळे नेहमीच चर्चेत असते. मात्र, या वेळी ही अभिनेत्री चर्चेत येण्यामागचे कारण विराट नसून, माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी याची पत्नी साक्षी आहे. अनुष्का आणि साक्षी या एकाच शाळेत शिकत होत्या. त्या जुन्या मैत्रिणी आहेत.

**cnx. Exclusive**
टीम सीएनएक्स

# रूपेरी पडद्यामुळे 'या' कलाकारांना मिळाले आयुष्याचे साथीदार!

रूपेरी पडद्यावर काम करीत असले तरी कलाकार हे देखील माणसेच असतात. त्यांनाही प्रेम, मैत्री, भावना असतातच, नाही का? अनेकदा मालिकांच्या सेटवरच त्यांची मैत्री होते. मग मैत्रीचे प्रेमात रूपांतर होते आणि मग या प्रेमाला लग्नाचा धागा बांधला जातो. अनेक कलाकारांच्या करिअरसोबतच त्यांची लव्हलाइफसुद्धा एकताच्या शोजसोबत जुळली आहे. अनेक स्टार्सची भेट शोच्या सेटवर झाली. शूटिंगच्या काळात जवळीक वाढली आणि नंतर हे सेलिब्रिटी खासगी आयुष्यात लग्नाच्या बेडीत अडकले. मालिकेत दीर-वहिनी, बहीण-भावाच्या भूमिकेत झळकलेल्या जोड्या खासगी आयुष्यात एकमेकांच्या जोडीदार बनल्या...

### राम- गौतमी - २००३



राम कपूर आणि गौतमी गाडगीळची प्रेमकहाणी एका टीव्ही शोच्या सेटवर सुरू झाली होती. त्या काळात गौतमीचे करिअर सेट झाले होते. मॉडेलिंगमध्ये गौतमीचे नाव होते, तर राम कपूरचे करिअर रुळावर यायचे होते. या मालिकेत गौतमीने राम कपूरच्या वहिनीची भूमिका साकारली होती. शूटिंगच्या निमित्ताने दोघांची दररोज भेट व्हायची. हळूहळू दोघांची मैत्री झाली आणि मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. लग्नासाठी राम आणि गौतमीने १४ फेब्रुवारी २००३ अर्थातच व्हॅलेंटाइन डेची निवड केली होती. आता या दाम्पत्याला दोन मुले आहेत.


### हितेन-गौरी : २००४



टीव्ही अॅक्टर हितेन तेजवानीने एका मालिकेतील त्याची को-स्टार राहिलेल्या गौरी प्रधानसोबत लग्न केले आहे. गेल्या १३ वर्षांपासून ही जोडी सुखी वैवाहिक आयुष्य जगत आहे. हितेनचे हे दुसरे तर गौरीचे पहिले लग्न आहे. आई-वडिलांच्या सांगण्यावरून हितेनने पहिले अॅरेंज मॅरेज केले होते. मात्र, ११ महिन्यांतच हे नाते संपुष्टात आले होते. हितेन-गौरीने अनेक टीव्ही मालिकांमध्ये एकत्र काम केले आहे.

### दिव्यांका आणि विवेक : २०१६

सध्या टीव्ही जगतातील सर्वांत प्रसिद्ध अभिनेत्री म्हणजेच दिव्यांका त्रिपाठी. तिच्या एकेक अदांवर अख्खे टीव्ही जगत फिदा असते. ती मालिकेत इशिता ही मुख्य भूमिका साकारत आहे. याच मालिकेच्या सेटवर विवेक दाहियासोबत तिचे सूत जुळले. विवेकने मालिकेत एसीपी अभिषेक सिंहची भूमिका साकारली आहे. सेटवर सुरू झालेले प्रे २०१६ मध्ये लग्नाच्या मंडपापर्यंत पोहोचले.



### मानव -श्वेता : २००४

एका मालिकेच्या माध्यमातून ही जोडी जवळ आली. सेटवर एकमेकांच्या प्रेमात पडल्यानंतर दोघांनी २००४ मध्ये लग्न केले. लग्नाच्या ९ वर्षांनी त्यांची मुलगी जेहराचा जन्म झाला.



### मौली आणि मजहर : २०१०




एका शोमध्ये दीर-वहिनीची भूमिका साकारणारे मजहर सईद आणि मौली गांगुली यांनी ७ वर्षांच्या डेटिंगनंतर ऑक्टोबर २०१० मध्ये लग्न केले. २००९ मध्ये मौली आणि मजहर यांनी एका शोमध्ये पार्टिसिपेट केले होते. त्यावेळी त्यांच्या या जोडीवर प्रेक्षकांनी भरभरून प्रेम केले.

### शक्ती आणि नेहा : २०१५



एका मालिकेच्या सेटवर दोघांची भेट झाली होती. खरंतर सुरुवातीला सेटवर दोघांची 'तू तू मैं मैं' झाली होती. मात्र नंतर दोघांची मैत्री झाली आणि प्रेम फुलले. दोघांच्या ऑनस्क्रीन आणि ऑफस्क्रीन केमिस्ट्रीची बरीच चर्चा झाली. जून, २०१४ मध्ये दोघांचा साखरपुडा झाला. काही मीडिया रिपोर्ट्सनुसार, २०१५ मध्ये दोघांनी लग्न केले.

## हेलनलाही भेडसावल्या 'या' समस्या



वयाच्या १९ व्या वर्षी अभिनेत्री हेलन यांना 'हावडा ब्रिज' या सिनेमात पहिली संधी मिळाली. यातील 'मेरा नाम चुन चुन' या गाण्याने रसिकांना वेड लावलं. यामुळे बॉलिवूडच्या पहिल्या आयटम गर्ल अशी ओळख त्यांना मिळाली. हेलन यांनी आपल्या डान्ससह सौंदर्याने रसिकांच्या काळजात अढळ स्थान मिळवलं. मात्र, त्यांचं हेच सौंदर्य त्यांना त्रासदायक ठरू लागलं. सुंदर असल्याचा त्रासही त्यांना सहन करावा लागला. कधी कधी तर त्यांना छेडछाडीचा त्रासही सहन करावा लागला. मात्र घरची परिस्थिती बिकट असल्याने त्यांना काम थांबवणं शक्य नव्हतं. त्यामुळे या छेडछाडीचा सामना करण्यासाठी त्यांनी एक शक्कल शोधून काढली. शूटिंगला जाताना हेलनजी बुरखा घालून घरातून बाहेर पडू लागल्या. त्यामुळे हेलनजींना ओळखणं शक्य नव्हतं. अशा प्रकारे त्यांनी छेडछाडीपासून स्वतःचा बचाव केला.

## मलाइकाने घेतली होती शिल्पाची जागा



'दिल से' या चित्रपटात शाहरुख खान, मनीषा कोईराला यांच्या मुख्य भूमिका होत्या. सुखविंदर सिंगच्या आवाजातील मलाइका अरोरावर चित्रित 'चल छैय्या छैय्या' हे गाणे आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहे. या गाण्यातील मलाइकाचे नृत्य सगळ्यांनाच भावले होते. मलाइका एका गाडीच्या छतावर नाचते, असे या गाण्यात प्रेक्षकांना पाहायला मिळाले होते. या चित्रपटाचे दिग्दर्शक मणीरत्नम यांची या गाण्यासाठी पहिली पसंती ही मलाइका नव्हे तर शिल्पा होती. शिल्पाच्या नृत्याचे नेहमीच कौतुक केले गेले. त्यामुळे तिला 'दिल से' या चित्रपटातील 'चल छैय्या छैय्या' या गाण्यातील नृत्यासाठी विचारण्यात आले होते. तिने या गाण्यासाठी होकार दिला होता आणि तिला साइनदेखील करण्यात आले होते. पण केवळ एका कारणामुळे तिला या चित्रपटातून डच्चू देण्यात आला.

